नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २८ एप्रिल २०२४**

................................................ ................................................

## पोलीस स्टेशन कुही हद्दीत गांजा विक्रेत्यावर ग्रामीण पोलीसांची धडक कारवाई

दिनांक २७.०४.२०२४ चे रात्री ०१.०५ ते ०२.३० वा दरम्यान पोलीस स्टेशन कुही हद्दीतील मांढळ वार्ड क्र ०२ येथे अवैध गांजा विक्रि होत असल्याची गोपनिय माहीती कुही पोलीसांना मिळाल्याने पोलीस स्टेशन कुही व तेथील अधिकारी व स्टॉफ, पंच, फोटोग्राफर, वजनकाटा, दुकानदार, असे वरीष्ठांना माहीती देवुन मा. दिपक अग्रवाल साहेब, भापोसे, सहा पोलीस अधिक्षक तथा ठाणे प्रभारी यांचे नेतृत्वात सदर इसमास आपली ओळख देवुन त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव राकेश बाबुराव ठवकर वय ५० वर्ष रा वार्ड क्र २, मांढळ ता कुही असे सांगितले वरून सदर इसमाची व घराची झडती घेतली असता बेडरूम मध्ये एका केशरी रंगाच्या पिशवीत प्लास्टीक पन्नीमध्ये गुंगीकारक वनस्पती गांजा आढळुन आला. १. गाज्यांचे वनज ४५०.४८ ग्रॅम किंमत ९०००/— रू २. केसरी रंगाची पिशवी कि २०/—रू असा एकुण ९०२०/—रू चा माल जप्त करून सदर आरोपीवर कलम २० एन.डी.पी.एस ॲक्ट अन्वयें गुन्हा दाखल करून तपास पोलीस उपनिरीक्षक श्री हरीहर सोनकुसरे करीत आहे.

सदरची कारवाई नागपुर ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधिक्षक मा. श्री हर्ष पोद्दार (भापोसे) तसेच अप्पर पोलीस अधिक्षक मा श्री रमेश धुमाळ, यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी ठाणेदार मा. श्री दिपक अग्रवाल(भापोसे) सहा.पोलीस अधिक्षक पोलीस स्टेशन कुही, पोलीस उपनिरीक्षक श्री हरीहर सोनकुसरे, सफौ दुर्गा शंभरकर, पोलीस हवालदार सुधीर ज्ञानबोनवार, पोलीस अंमलदार रंजीत मेश्राम, रविंद्र मारबते, अर्जुन नाकतोडे, महीला पोलीस अंमलदार सिमा, चालक पोलीस अंमलदार भुमेश्वर भेंडारकर यांचे पथकाने पार पाडली.

## अवैध्य जुगार अड्डयावर धाड. ४ आरोपीवर कारवाई १ फरार
## २ मोटर सायकलसह एकुण ९३१००/—रू चा माल जप्त

दिनांक २७.०४.२०२४ रोजी पोलीस स्टेशन जलालखेडा येथील अधिकारी व स्टॉफ हे पोलीस स्टेशन परीसरात पेट्रोलींग करीत असता गोपनिय मुखबीरद्वारे माहीती मिळाली कि, जलालखेडा शेत शिवारात वर्धा नदीच्या काठी काही इसम ५२ तासपत्तांच्या जुगार खेळ खेळत आहे. अश्या माहीतीवरून सदर ठिकाणी धाड टाकली असता घटनास्थळी १. **राजेश पुंडलीक चौरे वय ५० वर्ष रा जलालखेडा ता नरखेड जि नागपुर २. अमित श्रीकृष्ण चौधरी वय ३६ वर्ष रा जलालखेडा ता नरखेड**

**जि नागपूर ३. रमेश बाबुराव कोकाटे वय ५३ वर्ष रा मदना ता नरखेड जि नागपूर ४. नौशाद बेग वल्द रशीद बेग वय ३० वर्ष रा जलालखेडा ता नरखेड जि नागपूर ५. अन्तु पठान अंदाजे वय ३५ वर्ष रा जलालखेडा ता नरखेड** (फरार) असे घटनास्थळी ५२ तासपत्त्यांचा जुगार खेळ खेळतांनी मिळुन आले. पंचासमक्ष अंगझडतीमध्ये नगरी १८१००/— रू व दोन मोटर सायकल किमती ७५०००/— रू असा एकुण ९३१००/— रू माल पंचासमक्ष आरोपी कडुन मिळुन आल्याने जप्त करून जुगार कायद्याअंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधिक्षक मा. श्री हर्ष पोद्दार (भापोसे) तसेच अप्पर पोलीस अधिक्षक मा श्री रमेश धुमाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग यांचे मार्गर्शनात ठाणेदार श्री सी बी चौहान, पोलीस उपनिरीक्षक श्री मनोज शेंडे, पोलीस अंमलदार आशिष हीरूळकर, संतोष क्षीरसागर, किशोर कांडेलकर, चालक रविंद्र मोहोंड यांच्या पथकान पार पाडली.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**